# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/37/2026**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ०८/०७/२०२६**

**'घरफोडी चोरी करणारा सराईत गुन्हेगार अटक करुन नवी मुंबई गुन्हे शाखेने आणले १३ गुन्हे उघडकीस '**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दिपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) व श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त ( गुन्हे शाखा ) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरातील घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश व मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

नवी मुंबई रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.नं. २४०/२०२६, भा.न्या.सं.चे कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) या दाखल गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा, कक्ष-१ चे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळ व आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची निरंतर पाहणी केल्यावर फुटेज मधील आरोपीचा फोटो डेव्हलप केला. नमुद फोटोमधील आरोपी घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार **लक्ष्मण सुरेश शिवशरण** हा असल्याचे बातमीदारांनी व यापुर्वी त्यास अटक करणा-या तपासीक अंमलदारांनी खात्रीपुर्वक सांगीतले. सदर आरोपीचा नवी मुंबई, भिवंडी व ठाणे परीसरात शोध घेवुन त्यास भिवंडी परीसरातुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

सदर आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने वरील नमुद गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपी **लक्ष्मण सुरेश शिवशरण, वय ४८ वर्षे, रा. रूम नं. २०२, दुसरा मजला, राज पॅलेस सोसायटी, काल्हेर, भिवंडी, ठाणे** यास नमुद गुन्हयात **दिनांक २८/०६/२०२६ रोजी** अटक करण्यात आली असुन त्याची **दिनांक ०९/०७/२०२६** रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे. सदर अटक आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये त्याने नवी मुंबई परीसरात एकुण **१३** घरफोडी चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. **अटक आरोपी कडुन एकुण २१,२५,०५०/-रू. किंमतीचे सोन्याचे (२४५.६७ ग्रॅम) व चांदीचे (२०८.५ ग्रॅम) वजनाचे दागिने तसेच इतर वस्तु** हस्तगत करण्यात आले आहे. गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशी करीत आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी एकुण **४९ गुन्हे** दाखल आहेत.

**उघडकीस आणलेले गुन्हे** :-

**१.** रबाळे एमआयडीसी पो.स्टे.गु.र.नं. २४०/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१(४)
**२.** रबाळे एमआयडीसी पो.स्टे.गु.र.नं. २४३/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१(४)
**३.** रबाळे एमआयडीसी पो.स्टे.गु.र.नं. १८९/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४)
**४.** रबाळे एमआयडीसी पो.स्टे.गु.र.नं. २३७/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१(३), ३३१(४)
**५.** रबाळे एमआयडीसी पो.स्टे.गु.र.नं. १७३/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०५
**६.** रबाळे पो.स्टे.गु.र.नं. ३१८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१(४)
**७.** रबाळे पो.स्टे. गु.र.नं. ९९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४)
**८.** रबाळे पो.स्टे.गु.र.नं. ३५७/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३)
**९.** रबाळे पो.स्टे.गु.र.नं. ५८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (१), ३३१(४)
**१०.** कोपरखैरणे पो.स्टे.गु.र.नं. १९५/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४)
**११.** कोपरखैरणे पो.स्टे.गु.र.नं.१२२/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४)
**१२.** वाशी पो.स्टे.गु.र.नं. ६४/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१(४)
**१३.** तुर्भे पो.स्टे.गु.र.नं. २१८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१(३)

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्रीमती प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष- ०१ वाशी चे वपोनि/विकास घोडके, सपोनि/निलेशकुमार महाडीक, पोउपनि/प्रदिप बोरुडे, श्रेणी पोउपनि/उदय म्हात्रे, सपोउपनि/अशोक खैरे, पोहवा/१०१० चंद्रकांत कदम, पोहवा/४६१७ विश्वास भोईर, मपोहवा/९५८ अंजली विशे, पोना/२७६८ अझहर मिर्झा, पोशि/३०७६ सचिन पाटील, पोशि/१२५०६ भारत सानप, पोशि/३८४३ विशाल सावरकर व मपोशि/४८८८ स्नेहा घोरपडे यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★